मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेकडून देशी वृक्ष लागवड मोहिमेस प्रारंभ

## पिंपरी चिंचवड महापालिका, वन विभाग पुणे व वेदव्यास प्रतिष्ठानचा उपक्रम

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिका, वन विभाग पुणे व वेदव्यास प्रतिष्ठान पुणे यांच्या वतीने शहरात एक लाख देशी वृक्षांची लागवड करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात पहिल्या टप्प्यात ५० हजार देशी वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. या मोहिमेचा प्रारंभ आज डुडुळगावात स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज आणि आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात झाला.

याप्रसंगी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, वन विभागाचे उपवनसंरक्षक महादेव मोहिते, वनपरिक्षेत्र अधिकारी सुरेश वरक, महापालिकेचे मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, उद्यान अधीक्षक योगेश वाळुंज, उप उद्यान अधीक्षक राजेंद्र वसावे उपस्थित होते.

यावेळी स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज म्हणाले, ‘वृक्ष म्हणजे मानवाचे खरे सोबती आहेत. देशी वृक्ष लागवड व संवर्धन करून भविष्यातील पिढ्यांना शुद्ध हवा, पाणी व निरोगी वातावरण मिळू शकते. येथील वसुंधरेला वाचविण्यासाठी देशी वृक्षांची लागवड करणे गरजेचे आहे. देशी वृक्ष लागवड मोहिमेत सहभागी होऊन प्रत्येकाने किमान एक झाड लावून ते मोठे करण्याचा संकल्प करावा.’

दरम्यान, या मोहिमेत निसर्गाशी सुसंगत वाढणारे वड, पिंपळ, आंबा, जांभूळ, चिंच, कडूनिंब, बहावा, पळस, उंबर, आवळा, साग, करवंद, शेवगा, जास्वंद, काटेसावर, बेल, अर्जुन, सिरिस, पांगारा, कांचन, हिजळ, पन्हाळ, खैर, शेवती, तामण, सोनचाफा, पारिजात, मोरिंगा, पांगळी, करवंद काटेरी, सावर, कडंब अशा विविध वृक्षांचे रोपण करण्यात येणार आहे. हे सर्व वृक्ष स्थानिक हवामान व मातीला अनुरूप आहेत.



> पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने देशी वृक्ष लागवडीचा हरित उपक्रम हाती घेण्यात आला असून पर्यावरणपूरक शहर घडविण्यासाठी सर्वांनी एकत्र यावे. देशी वृक्ष लागवड ही केवळ एकदिवसीय मोहिम न मानता त्याचे संवर्धन हे सर्वांचे कर्तव्य आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक देशी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केला पाहिजे.
>
> **– शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका.**

### म्हणून देशी वृक्षांची केली जाणार लागवड

१. पर्यावरणीय संतुलनासाठी – देशी वृक्ष स्थानिक माती, पर्जन्यमान व हवामानाला सहज अनुरूप असल्याने त्यांची जोपासना सोपी होते. हे वृक्ष मातीची धूप थांबवतात, भूजल पातळी वाढवतात व हवामान बदलाचा परिणाम कमी करण्यास मदत करतात.
२. जैवविविधतेसाठी आश्रयस्थान – पक्षी, प्राणी, कीटक, फुलपाखरे यांना देशी वृक्ष सुरक्षित अधिवास पुरवतात. या वृक्षांच्या फुला-फळांमुळे स्थानिक प्रजातींचे पोषण व संवर्धन होते.
३. औषधी व आरोग्यदायी गुणधर्म – नीम, आवळा, बेल, अर्जुन यांसारखे देशी वृक्ष औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण असून आरोग्यवर्धक आहेत. ग्रामीण व नागरी भागात पारंपरिक उपचारपद्धतींमध्ये यांचा वापर मोठ्या प्रमाणात होतो.
४. सांस्कृतिक व धार्मिक मूल्य – वड, पिंपळ, आंबा, बेल यांसारख्या वृक्षांना भारतीय संस्कृतीत विशेष स्थान आहे. विविध धार्मिक विधी, सण व परंपरांमध्ये या वृक्षांचे महत्त्व अधोरेखित झालेले दिसते.६. शहरी भागासाठी उपयुक्त – देशी वृक्ष प्रदूषण शोषून घेण्याची क्षमता अधिक असल्याने शहरी परिसरात ते हवा शुद्ध ठेवतात. छाया व हरितपट्टा निर्माण करून नागरिकांना आरोग्यदायी वातावरण देतात.
५. आर्थिक फायदे – आंबा, चिंच, जांभूळ, करवंद यांसारख्या फळझाडांमधून पोषणासह शेतकऱ्यांना आर्थिक लाभ होतो. तसेच लाकूड, औषधी पदार्थ, पाने, बिया यांचा विविध उद्योगांमध्ये उपयोग होतो.

# विविध सामाजिक उपक्रमांनी निलेश नेवाळे यांचा वाढदिवस साजरा

## रोजगार मेळावा, आरोग्य शिबिर यासह सोलापूर, बीड जिल्ह्यातील पूरग्रस्तांनाही मदतीचा हात

**पिंपरी | प्रतिनीधी**

चिखली, नेवाळे वस्ती, पूर्णानगर प्रभाग क्रमांक ११ मधील भाजपाचे संयमी आणि अभ्यासू नेतृत्व अशी ओळख असलेले निलेश नेवाळे यांचा वाढदिवस रोजगार मेळावा, आरोग्य शिबिर, सोलापूर - बीड जिल्ह्यातील पूरग्रस्तांना मदतीचा हात देत विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

निलेश नेवाळे यांच्या वाढदिवसानिमित्त रविवार दि.२८ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ या कालावधीत ग्रामीण आणि शहरी भागातील तरुणांसाठी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात ३६७ तरूणांनी सहभाग घेतला, त्यापैकी २५६ जणांना तात्काळ जॉइनिंग लेटर देत नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

तसेच प्रभाग क्रमांक ११ नेवाळे वस्ती, हरगुडे वस्ती, कुदळवाडी भाग, कृष्णानगर, शरदनगर, कोयनानगर, महात्मा फुलेनगर, पुर्णानगर, घरकुल प्रकल्प, अजंठानगर, दुर्गानगर परिसरातील नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे देखील आयोजन करण्यात आले होते. यामध्ये १ हजार ३४३ नागरिकांनी सहभाग नोंदवला.




या शिबिरामध्ये मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, मोफत चष्मे वाटप, मोफत औषधे, शुगर तपासणी, रक्तदाब तपासणी, स्त्रीरोग तपासणी, अस्थिरोग तपासणी, त्वचारोग तपासणी यासह विविध तपासण्या अगदी मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच ९१७ नागरिकांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. तर १४ नागरिकांचे मोफत मोतीबिंदू ऑपरेशन देखील या शिबिरात मोफत रित्या करण्यात आले.

स्टेप्स फाउंडेशन या अनाथ विद्यार्थी संस्थेला शैक्षणिक मदत म्हणून ५ विद्यार्थीची जबाबदारी श्री निलेशदादा नेवाळे सोशल फाउंडेशन तर्फे घेण्यात आली. तसेच मराठवाडा, सोलापूर जिल्ह्यातील पुरग्रस्त भागात ५० पोती तांदूळ आणि ५० पोती गहू पाठवून श्री निलेशदादा नेवाळे सोशल फाउंडेशन तर्फे मदतीचा हात देण्यात आला.

निलेश नेवाळे यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार महेश लांडगे, आमदार अमित गोरखे, उद्योजक कार्तिक लांडगे, कामगार नेते इरफान सय्यद, विष्णुपंत नेवाळे, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, दत्तात्रय वाघेरे, माजी नगरसेवक राहुल कलाटे, एकनाथ पवार, निलेश बारणे, जितेंद्र ननावरे, उत्तम केंदळे, सुरेश तात्या म्हेत्रे, कुंदन गायकवाड, सुजित पाटील, माजी नगरसेविका योगिता नागरगोजे, भाजप युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव यांच्यासह सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी यावेळी उपस्थित राहत निलेश नेवाळे यांना शुभेच्छा दिल्या. तसेच प्रभाग ११ मधील भाजपाचे सर्व पदाधिकारी, टाळगाव चिखली मधील ग्रामस्थ आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

# लस निर्मितीसाठी हाफकिनला 25 कोटी

## हापकिन सक्षमीकरणासाठी शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी त्रिसदस्य समिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

लस निर्मितीच्या क्षेत्रात हाफकिन संस्थेचं मोलाचं योगदान असून देशातून पोलिओचे उच्चाटन करण्यामध्ये हाफकिनचा मोठा वाटा आहे. भारत सरकारकडून पोलिओच्या २६८ दशलक्ष मौखिक लसींची मागणी आहे. या लसींची निर्मिती करण्यासाठी हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाला हाफकिन खरेदी कक्षाच्या दोन टक्के उपकरातून २५ कोटी रुपयांचा निधी देण्यास उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत तत्वतः मान्यता देण्यात आली.

हाफकिन इन्स्टिट्यूट आणि हापकिन जीव औषध निर्माण महामंडळाचे सक्षमीकरण करण्यासाठी डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे. या समितीच्या शिफारशींची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात यावी. त्यामध्ये वैद्यकीय शिक्षण, सार्वजनिक आरोग्य आणि नियोजन विभागाच्या सचिवांचा समावेश करावा. या समितीने हाफकीनच्या सक्षमीकरणासाठी ५ वर्षांचा रोडमॅप तयार करावा, असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.




सध्या हापकिनकडे सर्पदंशावरील दीड लाख लस तयार आहेत. सर्पदंशावरील हाफकिनने तयार केलेली लस प्रभावी आणि परिणामकारक आहे. या लसींची खरेदी महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाने हापकिनमार्फत करावी, यावी असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील समिती कक्षात हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाच्या प्रश्नांसंदर्भात आणि संस्थेतील निवृत्त कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या निवृत्तीवेतनाबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, विधान परिषद सदस्य सचिन अहिर, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाचे सचिव धीरज कुमार, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, हापकिनचे व्यवस्थापकीय संचालक सुनील महिंद्रकर, विधि व न्याय विभागाच्या सहसचिव अश्विनी सैनी, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सहसचिव रामचंद्र धनावडे उपस्थित होते.

---

# "स्वस्थ नारी, सशक्त परिवार" अभियानाचा 50 हजाराहून अधिक नागरिकांनी घेतला लाभ

## महापालिकेच्या सर्व रुग्णालये व दवाखान्यांमध्ये 2 ऑक्टोबरपर्यंत चालणार मोफत आरोग्य शिबिर

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत "स्वस्थ नारी, सशक्त परिवार" हे विशेष राष्ट्रीय अभियान १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत देशभर राबविण्यात येत आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सर्व रुग्णालये आणि दवाखान्यांमध्ये १७ सप्टेंबर २०२५ रोजी हे अभियान सुरू झाले असून आतापर्यंत राबविण्यात आलेल्या या शिबिरामध्ये ५० हजाराहून अधिक महिला व बालकांनी विविध तपासण्या व उपचारांचा लाभ घेतला आहे.



सदर शिबिरांतर्गत महिलांसाठी, किशोरींसाठी व बालकांसाठी विविध आरोग्यविषयक सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामध्ये उच्च रक्तदाब, मधुमेह, कर्करोग, क्षयरोग व ॲनिमिया तपासणी, गर्भवती महिलांची तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी, पोषणविषयक समुपदेशन व लसीकरण यांचा समावेश आहे. तसेच किशोरींसाठी मासिक पाळी व पोषणविषयक सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय आयुष्मान भारत डिजिटल मिशन, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व आयुष्मान वय वंदना कार्ड यांचे वितरण, निक्षय मित्र स्वयंसेवकांची नोंदणी व क्षयरुग्णांना पोषण आहारासाठी दत्तक घेण्यास प्रोत्साहन देण्यात आले आहे. आवश्यकतेनुसार रुग्णांना रक्त, लघवी, सोनोग्राफी, एक्स-रे आदी तपासण्यांसाठी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले आहे.

महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली व आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांच्या अधिपत्याखाली हे अभियान प्रभावीपणे राबविले जात आहे. अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, सहायक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अंजली ढोणे तसेच सर्व रुग्णालयप्रमुख यांनी या अभियानाची अंमलबजावणी सुनिश्चित केली आहे. महापालिकेच्या सर्व रुग्णालये व दवाखान्यांमध्ये या अभियानांतर्गत २ ऑक्टोबर २०२५ पर्यंत आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून जास्तीतजास्त महिलांनी व किशोरींनी आरोग्यसेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागामार्फत करण्यात आले आहे.

> " महिलांचे आरोग्य चांगले राहिले तर कुटुंबातील प्रत्येक सदस्याचे आरोग्य सुरक्षित राहण्यास मदत होते. या मोहिमेद्वारे आरोग्यविषयक तपासण्या आणि आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध करून देणे हे आमचे प्राधान्य आहे. तरी जास्तीतजास्त महिलांनी या वैद्यकीय शिबिरांचा लाभ घ्यावा.
>
> **– शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका .**

> " "स्वस्थ नारी, सशक्त परिवार" या अभियानांतर्गत आयोजित करण्यात येत असलेल्या शिबिरांमुळे महिलांच्या नियमित वैद्यकीय तपासणीसह त्यांना पोषण आणि आरोग्यविषयक माहिती मिळत आहे. या शिबिरांमध्ये एकाच ठिकाणी विविध प्रकारच्या वैद्यकीय तपासण्या, मार्गदर्शन व उपचार उपलब्ध करून दिले आहेत.
>
> **– विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, महापालिका.**

> " मोफत आरोग्य शिबिरांमध्ये किशोरी, गर्भवती महिला व लहान बालकांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष दिले जात आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सर्व रुग्णालये व दवाखान्यांमध्ये २ ऑक्टोबर २०२५ पर्यंत ही शिबिरे दररोज सुरू राहतील. त्यादृष्टीने नियोजन करण्यात आले आहे.
>
> **– डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महापालिका.**

# हिंजवडीतील मेट्रो 20 किलोमीटर जादा धावणार

## मेट्रो विस्तारीकरणाच्या दुसऱ्या टप्प्यात शिवाजीनगर-कोंढवा मार्गिका प्रकल्पाला गती

**पुणे | प्रतिनिधी**

मेट्रो विस्तारीकरणाच्या दुसऱ्या टप्प्यात शिवाजीनगर-कोंढवा मार्गिका प्रकल्पाला गती देण्यासाठी सल्लागार नियुक्ती प्रक्रिया केली जाणार आहे. पुढील तीन महिन्यांत या मार्गिकेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करून मंजुरीसाठी केंद्र आणि राज्य सरकारकडे पाठविण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनचे (महामेट्रो) व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी सांगितले.

कोंढवा आणि येवलेवाडी भागातील वाहतूक समस्येचा मुद्दा नुकत्याच झालेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आमदार योगेश टिळेकर यांनी उपस्थित केला होता. तसेच, या प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला होता. मेट्रो मार्गिका क्रमांक तीन ही हिंजवडी ते शिवाजीनगर आणि तेथून पुढे कोंढव्यापर्यंत जाणार आहे. त्यामुळे कोंढवा, एनआयबीएम, येवलेवाडी परिसरातील रहिवाशांना दिलासा मिळणार आहे. या परिसरात गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात शहरीकरण झाले आहे. या पार्श्वभूमीवर शिवाजीनगर ते कोंढवा हा २० किलोमीटर मार्गिकेचा प्रकल्प महामेट्रोकडून प्रस्तावित करण्यात आला आहे.

'हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो मार्गही लवकरच सुरू होणार आहे. तत्पूर्वी महामेट्रोने मार्गिका विस्तारासाठी निविदा प्रक्रिया राबविली होती. महामेट्रोच्या प्रस्तावित खडकवासला, हडपसर, स्वारगेट आणि खराडी यांना जोडणाऱ्या मेट्रो




मार्गांना राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. याशिवाय, प्रस्तावित पुरंदर विमानतळाच्या दृष्टीने हडपसर ते सासवड या मेट्रो लाइन-४ च्या विस्ताराचाही प्रस्ताव आहे. या प्रकल्पांमुळे शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होईल, असे महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी स्पष्ट केले.

> शिवाजीनगर- कोंढवा प्रकल्पासाठी सल्लागार नियुक्तीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. पुढील तीन महिन्यांत 'डीपीआर' तयार करून अंतिम मंजुरीसाठी केंद्र आणि राज्य सरकारकडे पाठविण्यात येणार आहे.
>
> **– श्रावण हर्डीकर, व्यवस्थापकीय संचालक, महामेट्रो.**

# 'पीएमआरडीए'च्या हद्दीसाठी 'युडीसीपीआर' लागू करा

## राज्य सरकारकडून टाऊनशीपसाठीच 'युडीसीपीआर' नियमावली एप्रिल 2023 रोजी लागू

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा (पीएमआरडीए) प्रारुप विकास आराखडा अखेर रद्द झाल्याने हद्दीतील टाऊनशीप आणि महापालिकेतील समाविष्ट २३ गावांसाठी लागू असलेली एकत्रिकृत विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली (यूडीसीपीआर) लागू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

पीएमआरडीएची स्थापना ३१ मार्च २०१५ रोजी झाली. पीएमआरडीए हद्दीत सुमारे ८१४ गावांचा समावेश होत होता. त्यातील आता ११७ गावांतील बांधकाम परवानगीचे अधिकार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला देण्यात आले आहे. प्राधिकरण हद्दीसाठी राज्य सरकारकडून २१ नोव्हेंबर २०१८ मध्ये बांधकाम नियंत्रण नियमावली लागू करण्यात आली. राज्य सरकारकडून टाऊनशीपसाठीच 'युडीसीपीआर' नियमावली एप्रिल २०२३ रोजी लागू केली आहे. याचा फायदा केवळ १५ ते २० टाऊनशीपसाठी होत आहे.

राज्य शासनाने पीएमआरडीएच्या हद्दीतील २३ गावे महापालिका हद्दीत समाविष्ट केली. मात्र, बांधकाम परवानगीचे अधिकार मात्र पीएमआरडीएकडेच ठेवण्यात आले. त्यामुळे या २३ गावांमध्येही यूडीसीपीआर नियमावली लागू करण्यात आली. मात्र उर्वरित प्राधिकरणाच्या हद्दीत युडीपीसीआर नियमावली लागू करण्याकडे मात्र पीएमआरडीएने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरी हक्क समितीचे अध्यक्ष सुधीरकाका कुलकर्णी यांनी केला आहे.

पीएमआरडीएचा डीपी रद्द झाला असून त्यासंदर्भातील अधिसूचना जारी झाली आहे.




त्यामुळे आता प्राधिकरणाच्या हद्दीत प्रादेशिक विकास आराखडाच (आरपी) राहणार आहे. राज्य शासनाने ज्या क्षेत्रात आरपी लागू आहे, तिथे युडीसीपीआर ही बांधकाम नियमावली लागू केली आहे. त्यामुळे आपोआपच प्राधिकरणाच्या हद्दीतही युडीसीपीआर लागू होतो. त्यामुळे प्राधिकरणाने तत्काळ युडीसीपीआर बांधकाम नियमावली लागू करावी, अशी मागणी कुलकर्णी यांनी केली आहे.

### नियमावलीचे फायदे

- छोट्या भूखंड धारकांना फायदा होणार
- अनधिकृत बांधकामांना लगाम बसण्याची शक्यता
- बांधकाम क्षेत्राला चालना
- उत्पन्नात वाढ
- वाढीव एफएसआयचा (चटई क्षेत्र निर्देशांक) वापर
- ॲमेनिटी स्पेसचे बंधन नाही
- टीडीआर वापरण्यास परवानगी
- साइड मार्जिनसह अनेकांमध्ये सवलती

# पुणे-शिरुर उन्नत रस्त्यासाठी तीन कंपन्या उत्सूक


## सहा मार्गिकेच्या आणि 7515 कोटी रुपये खर्चाच्या या उन्नत रस्त्याच्या बांधकामासाठी एमएसआयडीसीकडून निविदा

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा महामंडळाने (एमएसआयडीसी) पुणे– छत्रपती संभाजी नगर शीघ्रसंचार द्रुतगती महामार्ग प्रकल्प आणि सध्याच्या पुणे – छत्रपती संभाजी नगर महामार्ग सुधारणा प्रकल्पाअंतर्गत पहिल्या टप्प्यात पुणे – शिरुर उन्नत रस्त्याचे बांधकाम करण्याचा निर्णय घेतला आहे. या उन्नत रस्त्याच्या बांधकामासाठीच्या तांत्रिक निविदा सोमवारी खुल्या करण्यात आल्या असून तीन कंपन्यांनी निविदा सादर केल्या आहेत. अदानी समुहाच्या अदानी एन्टरप्रायझेस लिमिटेडचाही त्यात समावेश आहे. आता आर्थिक निविदेत कोण बाजी मारते आणि हा प्रकल्प कोण मार्गी लावते हे आर्थिक निविदा खुल्या झाल्यानंतरच स्पष्ट होईल.

पुणे – छत्रपती संभाजी नगर प्रवास अतिजलद करण्यासाठी पुणे – छत्रपती संभाजी नगर शीघ्रसंचार द्रुतगती महामार्ग बांधण्यासह सध्याच्या पुणे – छत्रपती संभाजी नगर महामार्ग सुधारणा प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) हाती घेतला होता. मात्र गेल्या वर्षी हा प्रकल्प एमएसआयडीसीकडे देण्यात आला आहे. त्यानुसार शीघ्रसंचार महामार्गाच्या पहिल्या टप्प्यात ५४ किमी लांबीचा पुणे – शिरुर उन्नत रस्ता, तर सध्याच्या महामार्गात ५४ किमी लांबीचा पुणे – शिरुर उन्नत रस्ता बांधण्यात येणार आहे.

सहा मार्गिकेच्या आणि ७५१५ कोटी रुपये खर्चाच्या या उन्नत रस्त्याच्या बांधकामासाठी एमएसआयडीसीकडून काही महिन्यांपूर्वी निविदा मागविण्यात आल्या होत्या. सोमवारी दुपारी एमएसआयडीसीने तांत्रिक निविदा खुल्या केल्या असून या निविदेला चांगला प्रतिसाद मिळाल्याची माहिती एमएसआयडीसीतील अधिकाऱ्यांनी दिली. तीन कंपन्यांनी या उन्नत रस्त्याच्या कामासाठी उत्सुकता दर्शवली आहे. अदानी एन्टरप्रायझेस लिमिटेड, वेल्सपून एन्टरप्रायझेस लिमिटेड आणि जीआर इन्फ्राप्रोजेक्ट लिमिटेड



या तीन कंपन्यांचा त्यात समावेश आहे.

सादर निविदांची आता छाननी केली जाणार असून त्यानंतर आर्थिक निविदा खुल्या केल्या जाणार आहेत. त्यामुळे आर्थिक निविदा खुल्या झाल्यानंतरच कोणती कंपनी बाजी मारते हे स्पष्ट होईल. दरम्यान, निविदा अंतिम करत शक्य तितक्या लवकर या उन्नत रस्त्याच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्याचे एमएसआयडीसीचे नियोजन आहे. सहा मार्गिकेचा आणि ७५१५ कोटी रुपये खर्चाचा हा प्रकल्प 'बांधा – वापरा – हस्तांतरित करा' तत्वावर राबविण्यात येत असून प्रकल्पाचा खर्च वसूल करण्यासाठी या महामार्गावर पथकर आकारण्यात येणार आहे.

केंद्रीय भूपृष्ठ व महामार्ग मंत्रालय २००८ पथकर धोरणानुसार या रस्त्यावर पथकर वसूल केला जाणार आहे. तर हा रस्ता खुला झाल्यास पुणे – शिरुर अंतर केवळ ४५ मिनिटांत पार करता येणार आहे. या अतिजलद प्रवासासाठी वाहनचालक – प्रवाशांना २०३० पर्यंत वाट पाहावी लागण्याची शक्यता आहे. काम सुरू झाल्यापासून ते पूर्ण करण्यासाठी कंत्राटदारास चार वर्षांचा कालावधी देण्यात येणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प २०३० मध्ये पूर्ण होण्याची शक्यता आहे.

# अतिवृष्टीमुळे एक कोटी एकरहून अधिक क्षेत्राचे नुकसान

## शेतकऱ्यांना मदतीसाठी कृषी विभागाचे कर्मचारी देणार एक दिवसाचा पगार

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यात अतिवृष्टीमुळे अंदाजे 1 कोटी 1 लाख 24 हजार एकर क्षेत्राचे नुकसान झालेले आहे. सर्वांत जास्त नुकसान सप्टेंबर महिन्यात झालेले असून, या महिन्यातील नुकसानीच्या पंचनाम्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून, ते आव्हान आपल्यासमोर आहे. ते काम आम्ही लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. केंद्र सरकारला याबाबत सर्व माहिती द्यावी लागेल. केंद्राकडून लवकरात लवकर नक्की मदत होईल, अशी अपेक्षा आहे.

दरम्यान, राज्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे. त्यामुळे बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत म्हणून



राज्यातील कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी आपला एक दिवसाचा पगार हा मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी देणार आहेत. तसे पत्र कृषी कर्मचारी संघटनेने माझ्याकडे दिलेले असल्याची माहिती भरणे यांनी सोमवारी (दि. 29) पत्रकारांशी बोलताना दिली.

महाराष्ट्र राज्य राजपत्रित कृषी अधिकारी संघटनेचे (वर्ग 1) अध्यक्ष संजय काचोळे व शिष्टमंडळाने 350 अधिकाऱ्यांचा एक दिवसाचा पगार सुमारे 10 लाख रुपयांची मदत अतिवृष्टीग्रास्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी देणार असल्याचे पत्र कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना सोमवारी दिले. या वेळी डावीकडून सुनील जाधव, सूरज मडके, संजय पिंगट, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, संघटनेचे अध्यक्ष संजय काचोळे, विजयकुमार राऊत, सुधीर नयनवाड, सतीश शिरसाट.

### पुणे जिल्हा बँक देणार 26 लाख 51 हजार रुपये : प्रा. दुर्गाडे

**» राज्यात अतिवृष्टीमुळे आलेल्या पुरामुळे खरीप हंगामातील पिकांचे, जमिनीचे नुकसान होऊन शेतकरी अडचणीत आलेला आहे. या शेतकऱ्यांना मदत म्हणून पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने आर्थिक मदत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**

बँकेच्या 1 हजार 22 कर्मचाऱ्यांचा एक दिवसाच्या पगारातून सुमारे 25 लाख 51 हजार रुपये आणि संचालकांच्या बैठकीचा भत्ता एक लाख रुपये मिळून सुमारे 26.51 लाख रुपयांचे धनादेश हे मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी देणार असल्याची माहिती जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे यांनी दिली. तसेच, याबाबतचा निर्णयही राज्याचे कृषिमंत्री आणि जिल्हा बँकेचे संचालक दत्तात्रय भरणे हे सोमवारी (दि. 29) बँकेत आले असता तत्काळ त्यांना सांगितल्याचेही प्रा. दुर्गाडे यांनी सांगितले.